महाराष्ट्र राज्य लॉटरी
"महाराष्ट्र गणेशलक्ष्मी " या मासिक
सोडतींच्या बक्षिससंरचनेत व
कार्यपध्दतीत बदल करण्याबाबत.

कार्यालयीन आदेशक्रमांकः मरालॉ- २०२६/प्र.क्र.१८/लॉटरी-२
नवीन प्रशासन भवन,८ वा मजला,मंत्रालयासमोर,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० मे,२०२६

वाचा : उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई
यांचे पत्र क्र. उपसं (वि व ले) /मरालॉ/योजना /९७०/२०२६, दि. १६/०४/२०२६

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विविध लॉटरी सोडती केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ व लॉटरी (विनियमन) नियम, २०१० तसेच महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम, २००० भाग-१ प्रमाणे कार्यान्वित केल्या जातात. सदर कार्यालयीन आदेशानुसार उपसंचालक (वि. व ले.) यांना कळविण्यात येते की,

वस्तू व सेवाकर परिषदेच्या दि.०३/०९/२०२५ रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीमध्ये वस्तु व सेवा कराच्या दररचनेत केलेले बदल हे दि.२२/०९/२०२५ पासून लागू झाले आहेत. त्यानुसार लॉटरी तिकीट विक्रीवरील वस्तू व सेवाकर हा पूर्वीच्या २८% वरून ४०% इतका लागू करण्यात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या "महाराष्ट्र सहयाद्री" या मासिक सोडतींची बक्षिसरचना व कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

२. महाराष्ट्र राज्य लॉटरीची "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी" या मासिक सोडतीच्या तिकीटांचे दर्शनी मूल्य रू. १००/- (GST सहीत) असून एकूण १ लाख तिकीटे मुद्रीत करण्यात येतील. या सोडतीमध्ये १० मालिका असून प्रत्येक मालिकेमध्ये तिकीटांचे क्रमांक ०००० ते ९९९९ याप्रमाणे असतील सोडतीमध्ये सर्व मालिकांसाठी पहिले सामायिक बक्षिस रू. २२ लाखाचे ठेवण्यात आलेले आहे.

३. सदर सोडतीची तिकीट विक्री उपसंचालक (वि. व ले.), वाशी, नवी मुंबई कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यानुसार सदर सोडतीची तिकीटे उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ला मजला, प्लॉट नं. ७, दाणा बाजार, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर १९-बी, वाशी,नवी मुंबई-४००७०५ येथून विक्रेत्यांना उपलब्ध होतील.

४. सदर सोडतीच्या एका तिकीटाची दर्शनी किंमत रू.१००/- इतकी असून १०० तिकीटांचे १ पुस्तक असेल. सदर सोडतीची तिकीट विक्री करताना महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रेत्यांना खरेदी केलेल्या एकूण लॉटरी तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर [वस्तु व सेवा करासह (GST)] पुढीलप्रमाणे घाऊक सूट (Discount)देण्यात येईल.

अ.क्र.	तिकीटांची संख्या	अनुज्ञेय घाऊक सूट (GST सहीत)
१	५०० ते १०००० तिकीटे	१६%
२	१०००१ ते २५००० तिकीटे	२० %
३	२५००१ ते १००००० तिकीटे	२३%

जे घाऊक विक्रेते सोडतीच्या तिकीटांची प्रत्यक्ष खरेदी करतील त्यांना शासन निर्णय क्रमांक मरालॉ २०१२/ प्र.क्र.४७/लॉटरी-२, दिनांक ०८/०५/२०१२ मधील नमुद अटी व शर्तीनुसार त्यांनी खरेदी केलेल्या एकूण तिकीटांच्या संख्येनुसार (Actual number of total tickets purchased)२% (GST वगळून) विशेष सूट देण्यात येईल.

५. सदर सोडतीच्या तिकीट छपाईचे आदेश उपसंचालक (वि.व ले.) महाराष्ट्र राज्य लॉटरी, टीब्लॉक- १ला मजला, प्लॉट नं७ .,दाणा बाजार, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर -१९बी, वाशी, नवी मुंबई या कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या काढण्यात येतील. या तिकीटाचे आकारमान तिकीट छपाई २०X १० cms.९० GSM Croma Art Paper Rs. २८०/-प्रति लाख प्रति चौ.से.मी. +१८ % GST इतके राहील . शासन निर्णय क्र.मरालॉ / २०२५ / प्र.क्र.१२ लॉटरी-२ दि.२७/०१/२०२६ मधील नमूद तिकिट छपाईच्या दराप्रमाणे या सोडतीची तिकीटे मे.साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा.लि., फरीदाबाद यांचेकडून घेण्यात येतील. सदर सोडतींच्या तिकीटांची विक्री ही फक्त महाराष्ट्र राज्यातच करण्यात येईल . तसेच तिकीटांवर (For sale only in Maharashtra State) असा मजकूर छापण्यात यावा.

६. "महाराष्ट्र गणेशलक्ष्मी" या मासिक सोडतींची बक्षिस रचना -

मालिका : १०
तिकिटांचे क्रमांक : ०००० ते ९९९९
सोडत दिनांक : माहे जुलै, २०२६ पासून
सोडतीची वेळ : सायं.४.०० वाजता.

प्रत्येक मालिकेत १०,००० तिकिटे
एकूण तिकिटे : १ लाख
तिकिटांची किंमत : रू.१००/-(GST सहित)

बक्षिसे	बक्षिसाची रक्कमरूपये	प्रत्येक मालिकेतील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण संख्या	सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण रक्कम रुपये	एकून विक्रेता बोनस
पहिले सामाईक बक्षिस (पूर्ण क्रमांक)	२२,००,०००/-	--	१	२२,००,०००/-	२२,०००
प्रोत्साहनपर बक्षिस (पूर्ण क्रमांक) (पहिल्या बक्षिसाच्या मालिका वगळून उर्वरित ९ मालिकांसाठी)	९,०००/-	--	९	८१,०००	
दुसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१ क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	१०,०००/-	१	१०	१,००,०००/-	
तिसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५,०००/-	१०	१००	५,००,०००/-	
चौथे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	२,०००/-	१०	१००	२,००,०००/-	
पाचवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	१,०००/-	१०	१००	१,००,०००/-	
सहावे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी)	५००/-	१०	१००	५०,०००/-	
सातवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (कोणतेही ४०० क्रमांक सर्व मालिकांसाठी) (Random पध्दतीने))	२५०/-	---	४०००	१०,००,०००/-	
		एकूण:-	४४२०	४२,३१,०००/-	२२,०००
				२२,०००	
				४२,५३,०००	

७. घाऊक विक्रेत्याने ज्या किरकोळ विक्रेत्यास तिकीटे विकली असतील त्या किरकोळ विक्रेत्यांची यादी घाऊक विक्रेत्याने पुढील तिकीट खरेदीच्या वेळी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वाशी, नवी मुंबई या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

८. सोडत काढण्याची कार्यपध्दती :-

"महाराष्ट्र गणेशलक्ष्मी" या मासिक सोडती करीता सोडतीचे ठिकाणी ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी १ ड्रम ठेवण्यात येईल. त्या ड्रममध्ये मालिकांचे आद्याक्षरे/क्रमांक असतील. या सोडतीमध्ये एकूण १० मालिका आहेत. प्रत्येक मालिकेमध्ये ०००० ते ९९९९ असे तिकीटांचे क्रमांक असतील. या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटाचे क्रमांक निश्चित करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेल्या सोडत यंत्राचा (ड्रॉमशीन) वापर केला जाईल. या यंत्राच्या प्रत्येक चक्रावर ० ते ९ अंक असतील. पंचमंडळाच्या अध्यक्षांनी घंटी वाजविल्यावर सोडत यंत्र फिरविले जाऊन सोडतीची सुरुवात होईल.सोडत यंत्र फिरायचे थांबल्यानंतर जे क्रमांक यंत्रावर दिसतील, अध्यक्ष तो अंक घोषित करतील. अंक ज्या क्रमाने निघतील, त्या क्रमाने फलकावर प्रदर्शित केले जातील.

या सोडती मधील दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे, सहावे व सातवे बक्षिस काढण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.

८.१ दुसरे बक्षिस रु. १०,०००/- :- दुसऱ्या रु.१०,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पुर्ण अंकाचा एक क्रमांक निश्चित करण्यात येईल व तो क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. १०,०००/- च्या दुसऱ्या बक्षिसासाठी पात्र असेल.

८.२ तिसरे बक्षिस रु. ५,०००/- :- तिस-या रु.५,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पुर्ण अंकाचा एक क्रमांक याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या काढण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. ५,०००/- च्या तिसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.३ चौथे बक्षिस रू. २,०००/-:- चौथ्या रु.२,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पुर्ण अंकाचा एक क्रमांक याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या काढण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू.२,०००/- च्या चौथ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.४ पाचवे बक्षिस रूः १,०००/-:- पाचव्या रु.१,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल. पुर्ण अंकाचा एक क्रमांक याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या काढण्यात येतील.ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. १,०००/- च्या पाचव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.५ सहावे बक्षिस रू. ५००/- :- सहाव्या रु.५००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल. पुर्ण अंकाचा एक क्रमांक याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या काढण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. ५००/- च्या सहाव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.६ सातवे बक्षिस रू. २५०/- :- सातव्या रू. २५०/- च्या बक्षिसासाठी संगणकावर पूर्ण अंकाचे ४०० क्रमांक स्वंतत्ररित्या रॅन्डम पध्दतीने काढण्यात येतील व ते क्रमांक सर्व मालिकांसाठी रू. २५०/- च्या सातव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.७ पहिल्या क्रमाकांचे रू. २२,००,०००/- चे सामायिक बक्षिस काढण्याची कार्यपध्दतीः

या मासिक सोडतीमध्ये दहा मालिकांमधून रूपये बावीस लाखाचे पहिले सामायिक बक्षिस ठेवण्यात आलेले असून प्रथमत: दहा मालिकांमधून एक भाग्यवान मालिका निश्चित करण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक मालिकेची आद्याक्षरे व क्रमांक असलेली प्रत्येकी एक चकती घेण्यात येऊन ती प्रत्येक चकती स्वतंत्र प्लॅस्टिक/रबरी आवरणात घालून पंचमंडळाच्या समोर ड्रममध्ये ठेवली जाईल. अध्यक्षांनी घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम फिरविला जाऊन व पुन्हा घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम थांबविण्यात येईल. ड्रममधून एकच पिशवी (पाऊच) वाहेर काढून त्यातून चकती बाहेर काढण्यात येईल व ती पंचमंडळाला दाखविण्यात येईल. अध्यक्ष त्या चकतीवरील मालिकेच्या अद्याक्षरांची घोषणा करतील. त्यानंतर वरील परिच्छेद ८ मध्ये विहित केलेल्या पध्दतीने भाग्यवान क्रमांक काढण्यात येईल.

८.८. प्रोत्साहनपर बक्षिस रू.९,०००/- ची ९ बक्षिसे काढण्याची कार्यध्दती:-

या प्रोत्साहनपर बक्षिसासाठी पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाची मालिका वगळून उर्वरित ९ मालिकांकरिता पहिल्या बक्षिसांसाठी निश्चित करण्यात आलेल्या भाग्यवान क्रमांकास रु.९,०००/- चे प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात येईल.

८.९ पंचमंडळाचे सदस्य त्यांना पुरविलेल्या बक्षिस विजेत्या क्रमांकाच्या नोंदवहीत विजेत्या क्रमांकाची नोंद करुन घेतील व त्या प्रतीवर सही करतील आणि ती प्रत निकालाच्या अभिलेखाची विश्वसनीय प्रत म्हणून ठेवली जाईल.

८.१० या सोडतीमध्ये रॅन्डम क्रमांक वगळून इतर सर्व बक्षिसामध्ये एकापेक्षा जास्त भाग्यवान क्रमांक निश्चित करताना एखादा क्रमांक पुन्हा आल्यास तो रद्द करुन त्या ऐवजी पुन्हा नवीन भाग्यवान क्रमांक निश्चित करण्यात येईल.

८.११ या सोडतीतील बक्षिस विजेत्याने कोणत्याही बक्षिसाची मागणी करताना त्यास मूळ तिकीट शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच कोणत्याही तिकीटांवर एकाच बक्षिसाची मागणी करता येईल.

८.१२ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या कोणत्याही सोडतीमधील एखाद्या बक्षिसाकरिता एकापेक्षा जास्त पूर्ण भाग्यवान क्रमांक काढण्यात येत असतील अशावेळी कोणत्याही क्रमांकाची त्याच मालिकेत पुनरावृत्ती झाल्यास किंवा दोन्ही क्रमांक / एकापेक्षा जास्त क्रमांक सारखे आल्यास नंतर काढलेले क्रमांक रद्द करून त्याऐवजी नवीन क्रमांक काढण्यात येतील.

८.१३ वर नमुद केल्याप्रमाणे या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटांचे क्रमांक निश्चित करण्यासाठी ड्रम किवा विजेवर चालणारी व चक्रावर क्रमांक असलेली (ड्रॉ मशिन) सोडतयंत्र, या त्याचप्रमाणे सोडत जलद काढण्याच्या शासनाच्या दृष्टीने योग्य पध्दतीचा अवलंव सोडत काढताना करण्यात येईल.

८.१४ संगणकात तांत्रिक बिघाड होणे, वीजपुरवठा खंडीत होणे किंवा अकल्पीत नैसर्गिक आपत्ती इ.कारंणामुळे जर सोडत काढता आली नाही तर ती सोडत पुढील दिवशी काढून निकाल जाहीर करण्यात येईल.

९. सदर सोडतीची कार्यपध्दती पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या विहित तरतूदी / कायद्यानुसार या सोडतीच्या निकालाची प्रसिध्दी शासनाच्या राजपत्रात करण्याची कार्यवाही उपसंचालक (वि.व ले.),महाराष्ट्र राज्य लॉटरी, टी-ब्लॉक, १ला मजला, प्लॉट नं. ७,दाणा बाजार, ए.पी.एम.सी.मार्केट, सेक्टर १९-बी, वाशी, नवी मुंबई-४००७०५ या कार्यालयाकडून करण्यात येईल व यावावतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१०. सदर सोडतीचा तिकीट छपाईचाखर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, लॉटरी (००) (०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय (२०७५० ४७२),१६ - प्रकाशने तसेच बक्षिस विजेत्या तिकीटांचा खर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०३ राज्य लॉटरी, (००)(०१) प्रमुख लॉटरी, लॉटरी संचालनालय लॉटरी (२०७५०४७२) ०५- बक्षिसे या लेखाशिर्षामधील सन २०२६-२७ मधील उपलब्ध तरतूदींतून भागविण्यात यावा.

११. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे Notification No.4/2017- Central Tax (Rates) दिनांक २८/०६/२०१७ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

Sr. No.	Tariff item, sub-heading, heading or chapter	Description of supply of Goods	Supplier of goods	Recipient of supply
5.	--	Supply of lottery	State Government, Union Territory or any local authority	Lottery distributor or selling agent. *Explanation.*- For the purposes of this entry. lottery distributor or selling agent has the same meaning as assigned to it in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010, made under the provisions of sub-section I of section II of the lotteries (Regulations) Act, 1998 (17 of 1998).

केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) नियम २०१० च्या नियम २ (c) मध्ये "distributor or selling agent" means an individual or a firm or a body corporate or other legal entity under law so appointed by the Organizing State through an agreement to market and sell lotteries on behalf of the Organizing State"असे नमूद आहे.

तथापि, सदर तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक लॉटरी सोडतींच्या तिकीट विक्रीसाठी शासनाने करार करून कोणताही अधिकृत विक्रेता नियुक्त केलेला नाही. त्यामुळे वरील नमूद नोटीफिकेशन मधील तरतुदींनुसार अधिकृत वितरक / विक्रेता वस्तु व सेवा कर भरणा करण्यासाठी आस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत वस्तु व सेवा कर वसूल करून भरण्यासंदर्भात आयुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालयाने पुढील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

"If State Government supplies these lottery Tickets directly to any person, who is not legally appointed/authorized as lottery distributor or selling agent as described in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010,- Tax shall be collected and shall be paid by State Government only, as aforesaid."

तरी वरील स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या या प्रस्तावित सोडतींवरील लॉटरी तिकीटांच्या विक्रीवर तिकीट विक्रेत्यांकडून केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार विहित केलेल्या दराने वस्तु व सेवा कर वसूल करून विहित पध्दतीने शासनाकडे भरण्याची कार्यवाही उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवी मुंबई यांनी करावी व यावावत्तची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१२. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.lottery.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

(प्रमोद भगत)
अवर सचिव तथा उपसंचालक,
राज्य लॉटरी, वित्त विभाग.

प्रति,

१. आयुक्त, राज्य लॉटरी, वित्त विभाग, मुंबई-३२.
२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२१.
३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२.
५. उपसचिव (राज्य लॉटरी), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-५१.
७. उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी, नवी मुंबई.
८. लेखाधिकारी, लॉटरी संचालनालय, मुंबई.
९. निवड नस्ती, लॉटरी -२.